स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

आंतरविद्या शाखेअंतर्गत समाजकार्य विषयातील विद्यावाचस्पती
(पीएच.डी) पदवीसाठी सादर करावयाच्या शोधनिबंधाचा आराखडा

- संशोधन विषय -

"आदिवासी विकास योजने अंतर्गत मिळणाऱ्या शासकिय लाभात आदिवासी लाभार्थींना येणाऱ्या अडचणी व त्यामधील विसंगती यांचा विश्लेषणात्मक अभ्यास"

(विशेष संदर्भ - हिंगोली जिल्हा)

संशोधक

जयपाल लालू राठोड
बि.एस.सी. (कृषी), एम.एस.डब्ल्यु., नेट, सेट.

मार्गदर्शक

डॉ.ए.पी. वलेकर
सहयोगी अधिव्याख्याता व संशोधन मार्गदर्शक,
जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालय,
सिडको, नांदेड.

मार्च - २०१८

प्रस्तावना -

आदिवासी विकास हा आजघडीला चर्चेत असलेल्या प्रमुख विषयांपैकी सामाजिक शास्त्रातील एक महत्वाचा विषय आहे. भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रीकेनुसार न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता ही शासन व्यवस्थेची व संविधानाची चार महत्वपूर्ण उद्दीष्ट्ये आहेत. ही उद्दीष्ट्ये खऱ्या अर्थाने तेव्हाच साध्य हातील, जेव्हा समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेला आदिवासी समाज विकासाच्या मुख्य प्रवाहात सामाविष्ट होईल.

मुळात आदिवसी म्हणजे "आदि" पासून रहात असलेली जमात असा अर्थ लावला जातो. नैसर्गिक पर्यावरणात राहणाऱ्या लोकांना कोणी जंगलाचे राजे म्हणुन देखील संबोधतात. विविध विचारवंत, अभ्यासक, प्रशासक व सामाजिक कार्यकर्ते यांनी सुद्धा या समुदायाला विविध नावे दिली आहेत. कोणी त्यांना धरतीची लेकरे, अगदी प्राचीन किंवा अगदी मूळचे रहिवासी असे संबोधले आहे.

डॉ.घुर्ये यांनी त्यांना तथाकथीत "**मूळचे रहिवासी**" (So coalled Aborigines) व "**मागासलेले हिंद**" (Backward Hindu) असे म्हटले आहे.

डॉ.दासानी यांनी "**बुडत असलेली जमात**" (Submerged Humanity) असे आदिवासी जमातीचे वर्णन केले आहे.

मानवशास्त्रज्ञांनी वैज्ञानिक पद्धतीने आदिवासी समाजाची व्याख्या केली आहे. विविध मानवशास्त्रज्ञ व अभ्यासकांच्या व्याख्यांच्या आधारे "एका समान भाषेचा वापर करणाऱ्या एकाच पूर्वजा पासून उत्पत्ती सांगणारा एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणाऱ्या तंत्रशास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेला, अक्षर ओळख नसलेला व रक्त संबंधावर आधारीत सामाजिक व राजकीय रितीरिवाजांचे प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला आदिवासी समाज" असे संबोधले आहे.

भारतीय संविधानात आदिवासी जमातीची व्याख्या आढळून येत नाही, तथापी राज्यघटनेत त्यांचा "**आदिवासी जमात**" या नावाने उल्लेख करण्यात आलेला आहे.

सद्यस्थितीत आदिवसी जमातीची क्षेत्रनिहाय स्थिती खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	**क्षेत्र**	**आदिवासी जमाती**
1	भारत देश	427
2	महाराष्ट्र राज्य	45
3	हिंगोली जिल्हा	03

राज्यघटनेनुसार प्रत्येक राज्यातील राज्यपालाशी विचार विनिमय करुन अनुसूचित जमातीची एक सूची बनविण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे. संसद या सूचीचे घटना कलम 341, 342 नुसार पुनर्निरिक्षण करु शकते.

भारतीय घटनेच्या कलम 46 अंतर्गत समाजाच्या दुर्बल घटकांचा आणि विशेषत: अनुसूचित जाती-जमातीच्या शैक्षणीक, सामाजिक व आर्थिक हितसंबंधाबाबत विशेष तरतूद केलेली आहे. त्याचा विकास करण्याकरिता आणि त्यांना सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण या पासून संरक्षण देण्यास शासन कटीबद्ध आहे.

सद्यस्थितीत आदिवासी लोकसंख्येबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे.

(आकडे हजारात)

अ.क्र.	**क्षेत्र**	**एकूण लोकसंख्या**	**आदिवासी लोकसंख्या**	**टक्केवारी**
1	भारत देश	1210569	104281	8.61
2	महाराष्ट्र राज्य	112374	10510	9.35
3	हिंगोली जिल्हा	1177	112	9.52

भारतीय संविधानाच्या कलम 275 (1) मधील तरतुदीनुसार दरवर्षी केंद्रशासनाकडुन राज्यशासनास विशेष सहाय्य प्राप्त होते, ते आदिवासी क्षेत्राच्या पायाभूत विकासाच्या योजनांवर खर्च करण्यात येते. आदिवासी क्षेत्राच्या तसेच या क्षेत्रामध्ये राहणाऱ्या आदिवासींच्या सर्वांगीण विकासा करिता केंद्रशासनाने केलेल्या सूचना व मार्गदर्शक तत्वानुसार, राज्यशासनाने आदिवासी विकासासाठी अनेक योजना व उपायोजना राबविल्या आहेत.

महाराष्ट्र शासन आदिवासी उपायोजना अहवाल सन 2016-17 नुसार मागील पाच वर्षात आदिवासी विकास योजना राबविण्याकरिता प्राप्त अनुदान व आदिवासी विकासावर खर्च करण्यात आलेल्या रकमेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	**वर्ष**	**प्राप्त अनुदान (करोड रु.)**	**खर्च (करोड रु.)**
1	2012-13	4005.00	3401.00
2	2013-14	4360.48	3979.42
3	2014-15	4814.92	4090.21
4	2015-16	5170.00	4562.55
5	2016-17	5357.71	--

सन 1972 पर्यंत समाजकल्याण विभागा अंतर्गत आदिवासी कल्याण हा विभाग कार्यरत होता. पुढे 1973 साली आदिवासी कल्याण विभाग स्वतंत्र करण्यात आला. सन 1975-76 साली राज्याला आदिवासी उपयोजना लागू झाली व त्याची अंमलबजावणी 1 एप्रिल 1976 पासून सुरु झाली. त्यामुळे विकास कार्याची दिशा केवळ कल्याणकारी योजना अशी न रहाता ती आदिवासी विकास योजना अशी करण्यात आली. या आदिवासी उपायोजनामध्ये महाराष्ट्रातील 15 जिल्ह्यातील 68 तालुक्यातील 6962 गावे व 12 शहरे यांचा समावेश आहे.

आदिवासी विकास प्रशासनाची संरचना खालील प्रमाणे आहे -



आदिवासी जमातीच्या परिपूर्ण विकासाकरिता उपायोजना तयार करणे व तिच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करण्याची जबाबदारी आदिवासी विकास विभागाकडे आहे. तथापी वस्तुस्थिती पहाता शासकिय यंत्रणेद्वारे तयार करण्यात आलेले असाधारण व आदर्शवादी नियोजन हे आदिवासी विकासाला पुरेशी उत्तेजना देवू शकलेले नाही असे निदर्शनास येते.

संशोधनाचे उद्देश -

1. आदिवासी विकास योजने अंतर्गत दिले जाणारे शासकिय लाभ (Benefits) व आदिवासी लाभार्थी (Beneficiaries) यांना प्रत्यक्षात मिळणारे लाभ यामध्ये विसंगती/ अंतर (Gap) निर्माण करणाऱ्या घटकांचा शोध घेणे.
2. आदिवासी लाभर्थींची निवड (Selection) करण्यासाठी व लाभार्थींना प्राधान्यक्रम देण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या शासकिय निकषांचा (Criteria) अभ्यास करणे.
3. शासकिय लाभ मिळविण्यासाठी आदिवासी लाभार्थींना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.
4. शासकिय लाभ पुरविणारी यंत्रणा व त्यांची कार्यपद्धती यांचे मुल्यमापन करणे.
5. आदिवासी लाभार्थींना मिळणारा शासकिय लाभ व आदिवासी लाभार्थी यामधील समाजकार्याची भूमीका अभ्यासणे.

संशोधनाची गृहितके -

1. शासकिय लाभ पुरविणारा घटक (Benefit Resource) व आदिवासी लाभार्थी (Beneficiary) या दोन्ही गोष्टींची एकात्मकता न साधल्यामुळे आदिवासी जमाती विकासापासून आजही वंचीत आहेत.
2. आदिवासी लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी व प्राधान्यक्रम देण्यासाठी वापरण्यात येणारे शासकिय निकष अभ्यासपूर्ण असले तरी परदर्शकपणे राबविण्यात येत नाहीत.
3. शासकिय लाभ मिळविताना आदिवासी लाभार्थ्यांना बऱ्याच अडचणी येतात ज्यामुळे त्यांच्या वेळेचा व पैशाचा अपव्यय होतो.
4. आदिवासी विकास योजनांची माहिती तळागाळातील आदिवासी लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यास शासकिय यंत्रणा काही प्रमाणात अयशस्वी ठरते व त्यामुळे बरेच आदिवासी लाभार्थी शासकिय लाभाबाबत अनभिज्ञ (Unaware) रहातात व योजनांचा लाभ घेवू शकत नाहीत.
5. आदिवासी लाभार्थींना मिळणारा शासकिय लाभ व आदिवासी लाभार्थी यामधील विसंगती दूर करण्यासाठी व्यवसायीक समाजकार्याला वाव आहे.

संशोधनाचे महत्व -

आदिवासी व अन्य समाजीतील लोकांच्या जीवनस्तरातील अंतर हे अत्यंत जास्त असून ते सर्वज्ञात आहे. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून अलग पडलेल्या आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात समाविष्ठ करण्यासाठी व आदिवासी जमातीच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणीक विकासाकरिता शासन प्रयत्नशील आहे.

शासनाच्या या प्रयत्नास थोडेथोडके यश आले असले तरी हे प्रयत्न आदिवासी परिस्थितीवर विशेष प्रभाव पाडू शेकले नाहीत, कारण आजही बहुतांश आदिवासींची कुटूंबे ही दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत आहेत.

डि.आर.डि.ए. च्या सर्व्हे नुसार, हिंगोली जिल्हा समाविष्ट असलेल्या आदिवासी विकास प्रकल्प, कळमनुरी अंतर्गत दारिद्र्य रेषेखालील आदिवासी जमातीच्या कुटुंबाची सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.-

अ.क्र.	क्षेत्र	अनुसुचित जमातीची कुटुंबे	
		एकूण ग्रामिण कुटुंब (Rural)	दारिद्र्य रेषेखालील कुटुंब (Below Poverty Line)
1	महाराष्ट्र राज्य	979817	624521
2	कळमनुरी प्रकल्प	13702	3453

उपरोक्त स्थितीचे अवलोकन केले असता असे प्रकर्षाने निदर्शनास येते की, आदिवासी समाजाच्या विकासाच्या संदर्भात केंद्र व राज्य शासनाचे प्रयत्न मोठ्या प्रमाणात सुरु असले तरीही आजही आदिवासी जनतेच्या समस्यांची सोडवणूक होऊ शकलेली नाही.

शासकिय लाभ पुरविणारा घटक (Benefit Resource) म्हणजेच शासकिय यंत्रणा व आदिवासी लाभार्थी (Beneficiary) या दोन्ही गोष्टींची एकात्मकता न साधल्यामुळे आदिवासी जमाती आजही विकासापासून वंचीत आहेत.

करिता शासकिय लाभ पुरविणारा घटक (Benefit Resource) व आदिवासी लाभार्थी (Beneficiary) या दोन्ही घटकामध्ये अंतर (Gap) निर्माण करणाऱ्या घटकांना आळा घालून, शासकिय लाभ पुरविणारी यंत्रणा (Benefit Resource) व आदिवासी लाभार्थी (Beneficiary) यामध्ये एकात्मकता साधून गुणवत्तापूर्ण आदिवासी विकास प्रक्रियेला चालना देण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन महत्वपूर्ण आहे.

तसेच आदिवासी लाभार्थींना शासकिय लाभापासून वंचीत ठेवणाऱ्या प्रमुख घटकांचे चिकित्सक मुल्यमापन करुन, योग्य निष्कर्षाचा शोध घेतल्यास त्याचा उपयोग नियोजनकर्त्यांना व प्रशासनाला अधिक गुणवत्तापूर्ण धोरण ठरविण्यासाठी हाऊ शकतो.

संशोधन मर्यादा -

प्रस्तुत संशोधनाची मर्यादा ही एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प, कळमनुरी अंतर्गत येणाऱ्या हिंगोली जिल्ह्यापुरती मर्यादीत राहील. हिंगोली जिल्ह्यातील जास्त आदिवासी लाभार्थींची संख्या असलेल्या गावांचा प्राधान्याने अभ्यास केला जाईल.

आदिवासी लाभार्थींना मिळालेले शासकिय लाभ, शासकिय लाभ मिळविताना आलेल्या अडचणी, शासकिय लाभापासून वंचित रहावे लागले असल्यास त्यामागची कारणे, आदिवासी लाभार्थींना शासकिय लाभापासून वंचीत ठेवणारे घटक, लाभार्थींना शासकिय लाभ पुरविणारी शासकिय यंत्रणा, आदिवासी लाभार्थींना शासकिय लाभ मिळवून देण्यासाठी कार्य करणाऱ्या स्वयंसेवी सामाजिक संस्था, सहकारी संघटना या सर्व बाबी हिंगोली जिल्ह्यापुरत्याच मर्यादीत रहातील.

संशोधनाचे भौगोलीक क्षेत्र -

संशोधनाचे भौगोलीक क्षेत्र म्हणुन हिंगोली जिल्ह्याची निवड करण्यात आलेली आहे. हिंगोली जिल्ह्याचे एकूण भौगोलीक क्षेत्रफळ 4,526 चौ.कि.मी. (4,69,241 हेक्टर) आहे. हिंगोली जिल्ह्यात एकूण 5 तालुके असून, 5 तालुक्या अंतर्गत एकूण गावांची संख्या 711 आहे.

हिंगोली जिल्ह्यात पेनगंगा, पूर्णा व कयाधू या तीन महत्वपूर्ण नद्या वाहतात. हिंगोली शहर हे कयाधू नदीच्या तीरावर वसलेले आहे. हिंगोली जिल्ह्याचे एकूण वनक्षेत्र केवळ 291 चौ.कि.मी. आहे.

हिंगोली जिल्ह्याच्या एकूण भौगोलीक क्षेत्रापैकी शेतीयोग्य क्षेत्र 5,10,011 हे. एवढे आहे. त्यापैकी सिंचनाखालील क्षेत्र केवळ 89,426 हे. एवढे आहे. हिंगोली जिल्ह्यात एकूण मोठे सिंचन प्रकल्प 2 आहेत व लघु सिंचन प्रकल्प 53 आहेत.

संशोधन कालावधी -

सदर संशोधनाकरिता सन 2011-12 ते सन 2017-18 या कालावधीतील आकडेवारीचे विश्लेषण करण्यात येईल. तसेच संशोधन कालावधी नोव्हे.-2017 ते नोव्हे.-2020 असा राहील.

साहित्य परिक्षण -

प्रस्तुत संशोधन विषयात अध्ययनासाठी विविध आदिवासी लाभार्थी यांच्या प्रतिक्रिया, शासकिय वार्षिक प्रशासन अहवाल (Administrative Report), वार्षिक अंकेक्षण अहवाल (Audit Report), शासकिय वार्षिक मुल्यांकन अहवाल (Evaluation Report), आदिवसी लाभार्थींना लाभ पुरविणाऱ्या शासकिय यंत्रणेतील जिल्हा स्तरावरील प्रमुख असलेले प्रकल्प अधिकारी यांचे मत तसेच विविध शासकिय उपायोजनांची अंमलबजावणी व त्यांचे अंतीम परिणामाबाबत तज्ञ व्यक्तींचे लिखीत साहित्य/ लेख व आवश्यकतेनुसार एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प, कळमनुरी या कार्यालयातील विषयाशी संबंधीत माहिती/ अहवाल इ. साहित्य संशोधनाचे दृष्टीने परिक्षणासाठी समाविष्ट करण्यात येतील.

संशोधन पद्धती -

सदर संशोधनाकरिता मुख्यत्वे विश्लेषणात्मक व संख्यात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल.

i. **नमुना निवड पद्धती -**

प्रस्तुत संशोधनाकरिता बहुस्तरीय नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात येईल ज्यामध्ये प्रथम स्तरावर हिंगोली जिल्ह्यातील एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प, कळमनुरी अंतर्गत येणाऱ्या आदिवासी क्षेत्राची निवड करण्यात येईल.

द्वितीय स्तरावर हिंगोली जिल्ह्यातील खेरडवाडी, गरोळ्याची वाडी, रामवाडी, खापरखेडा इ. काही 75 ते 100 टक्के आदिवासी लोकसंख्या असलेल्या 15 गावांची निवड करण्यात येईल.

तृतीय स्तरावर **साधा यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने** 300 लाभार्थ्यांची प्रातिनिधीक नमुना म्हणुन निवड करण्यात येईल.

ii. **तथ्य संकलन पद्धती -**

प्रस्तुत संशोधनाकरीता प्राथमिक तथ्य संकलन पद्धती व द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा वापर करण्यात येईल. प्राथमिक तथ्य संकलन पद्धतीमध्ये मुलाखत अनुसूची या तंत्राचा वापर करुन तथ्य संकलन करण्यात येणार आहे.

शासकिय लाभधारक आदिवासी लाभार्थीपैकी काही लाभार्थी शिक्षीत व बरेच लाभार्थी अशिक्षीत असल्याने मुलाखत सुची या तंत्राचा वापर करणे योग्य राहील.

द्वितीय तथ्य संकलन पद्धतीमध्ये संशोधनाशी संबंधीत पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, विविध शासकिय अहवाल, लेख, संगणक व इंटरनेट वरील उपलब्ध माहिती/ आकडेवारी इत्यादी साहित्यचा तथ्य संकलनाकरीता वापर करण्यात येईल.

iii. **मुलाखत अनुसूची तपासणी -**

प्रस्तुत संशोधनातील तथ्य संकलनाकरिता तयार करण्यात येणारी मुलाखत अनुसूची, हिंगोली जिल्ह्यातील शासकिय लाभधारक आदिवासी लाभार्थ्यांकडून भरुन घेतल्यानंतर सदर मुलाखत अनुसूचीची पूर्व तपासणी करुन प्रश्नावलीचे मुल्यांकन करण्यात येईल. तद्नंतर आवश्यकतेनुसार मुलाखत सुचीमध्ये फेरबदल करुन त्यास अंतीम रूप देण्यात येईल.

iv. **तथ्य प्रक्रियाकरण -**

संशोधन प्रक्रियेदरम्यान संकलीत करण्यात आलेल्या तथ्यांना अंतीम रूप देताना संकलीत तथ्य योग्य पद्धतीने प्रक्रियाकरण करणे आवश्यक आहे. तथ्य प्रक्रियाकरण करत असताना गुणात्मक व संख्यात्मक माहिती वेगळी करुन तथ्यांना विश्लेषीत करण्यात येईल. तथ्य विश्लेषण पूर्ण झाल्यानंतरच त्यातून अंतीम निष्कर्ष काढण्यात येईल. तथ्य प्रक्रियाकरणात खालील घटकांचा समावेश करण्यात येईल.

a) **संपादन करणे -**

संशोधन प्रक्रियेदरम्यान संकलीत करण्यात आलेल्या तथ्यांची योग्य पद्धतीने मांडणी करुन तथ्यांची फेरतपाणी व मुलाखत अनुसूचीचे परिक्षण करण्यात येईल. आवश्यकतेनुसार संशोधनाच्या दृष्टीने आवश्यक माहिती संपादीत केली जाईल व निरुपयोगी माहिती वगळण्यात येईल.

b) **वर्गीकरण करणे -**

संशोधन प्रक्रियेदरम्यान संकलीत करण्यात आलेल्या तथ्यांना गुणात्मक व संख्यात्मक गुणवैशिष्ट्यांच्या आधारे वर्गीकृत करण्यात येईल. वर्गीकरणाच्या आधारे विखुरलेली माहिती संक्षीप्त करुन त्यास संघटीत रूप दिले जाईल.

c) **संकेतीकरण -**

वर्गीकरणाद्वारे विखुरलेली माहिती संक्षीप्त करुन त्यास संघटीत रूप दिल्यानंतर सदर तर्गीकरणास संकेत (Code) दिले जातील. संकेतीकरणामुळे व्यापक तथ्यांना लघू रूपात मांडणे शक्य होईल.

d) **मास्टर चार्ट -**

संशोधन प्रक्रियेदरम्यान संकलीत करण्यात आलेले सर्व तथ्य मास्टर चार्टद्वारे संक्षीप्त रुपात मांडण्यात येतील. मास्टर चार्टमध्ये मुलाखत अनुसूची क्रमांक, प्रश्न क्रमांक, संकलीत तथ्य इत्यादी बाबींची संक्षीतप्त रुपात एकत्रीत मांडणी करण्यात येईल.

e) **आलेख -**

संशोधन प्रक्रियेदरम्यान संकलीत करण्यात आलेल्या तथ्यांची संक्षीप्त तुलनात्मक माहिती एकत्रीतपणे आलेख पेपरवर सविस्तरपणे सादर करण्यात येईल.

f) **सारणीकरण -**

संकलीत तथ्यांचे सविस्तरपणे संपादन, वर्गीकरण, संकेतीकरण व मास्टर चार्ट तयार केल्यनंतर सारणीकरण करणे महत्वाची पायरी आहे. संकलीत तथ्यांची तुलनात्मक माहिती सारणीद्वारे मांडण्यात येईल. सारणीकृत तथ्याची तुलना करुन सामान्य निष्कर्ष मांडले जातील. सारणीकरण करताना अनुक्रमांक, विवरण, वारंवारीता, शेकडा प्रमाण इत्यादी सांख्यीकी तंत्राचा वापर करण्यात येईल.

v. **गृहितकृत्याची पडताळणी व निष्कर्ष -**

गृहितकृत्याची पडताळणी व निष्कर्ष ही संशोधन प्रक्रियेतील एक महत्वाची पायरी आहे. तथ्य विश्लेषणाच्या आधारे संशोधनाचे उद्देश व गृहितकाला धरून निष्कर्ष मांडण्यात येतील. तसेच गृहितकांचे परिक्षण व पडताळणी करुन कोणती गृहितके बरोबर ठरली व कोणती गृहितके सिद्ध झाली नाहीत याचा शोध घेतला जाईल व अंतीम निष्कर्ष काढले जातील. अंतीम निष्कर्षाच्या आधारे संशोधन समस्येविषयी योग्य उपायोजना व धोरणात्मक दुरुस्त्या सुचविल्या जातील.

संदर्भग्रंथ सूचि (Bibliography)

1. महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभागाची सन 2016-17 या वर्षाकरिता माहिती पुस्तीका
2. महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभागाचे वार्षिक आदिवासी उपायोजना सन 2016-17 (ANNUAL TRIBAL SUB PLAN 2016-2017)
3. लोकराज्य मासिक आदिवासी ते आग्रक्रम विशेष माहे ऑगस्ट 2016
4. आदिवासी विद्यार्थ्यांच्या सुवर्णमहोत्सवी शिष्यवृत्ती योजनेचा बोजबारा ही लोकसत्ता या वृत्तपत्रातील बातमी दिनांक दिनांक 22.02.2018
5. आदिवासी विकासाचा 2 कोटीचा निधी परत ही लोकसत्ता या वृत्तपत्रातील बातमी दिनांक 01.08.2013
6. आदिवासी खेड्यातील दारिद्र्य, किनवट तालुका - श्री.देशमुख सुदर्शन कोंडबाराव यांचे संशोधन
7. YOJANA MONTHLY REPORT FOR JANUARY 2014
8. AUDIT REPORT OF THE COMPTROLLER AND AUDITOR GENERAL OF INDIA ON GENERAL AND SOCIAL SECTOR FOR THE YEAR ENDED MARCH 2015 GOVERNMENT OF MAHARASHTRA Report No.4 of the year 2016
9. REPORT OF THE COMPTROLLER AND AUDITOR GENERAL OF INDIA ON GENERAL AND SOCIAL SECTOR FOR THE YEAR ENDED MARCH 2015
10. MINISTRY OF TRIBAL AFFAIRS GOVERNMENT OF INDIA ANNUAL REPORT 2016-17
11. How to Take Benefits - Anand Saroi

संशोधक

जयपाल लालू राठोड
एम.एस.डब्ल्यु, नेट, सेट
गृहपाल
आदिवासी मुलांचे शासकिय वसतिगृह
परभणी.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. ए.पी. वलेकर
सहयोगी अधिव्याख्याता व
संशोधन मार्गदर्शक
जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालय,
सिडको नांदेड.